दिनांक ०९/०५/२०२२

# प्रसिध्दी पत्रक

**आलोसे श्री.गणेश तेजराव सास्ते वय-34 वर्षे धंदा- नोकरी पद- निरीक्षक सार्वजनिक न्यास नोंदणी, कार्यालय,औरंगाबाद (वर्ग-3 )रा. फ्लॅट नंबर 301 मिलेनिया हाईट, भाग्यनगर, औरंगाबाद यांनी तक्रारदार यांच्याकडुन रु. 15,000/लाचेची रक्कम स्विकृती केल्याने, ते लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबादच्या जाळयात.**

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | :- | औरंगाबाद |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस ठाणे क्रांतीचौक,औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल आहे. |
| आलोसे यांचे नाव हुद्दा व पत्ता | :- | श्री.गणेश तेजराव सास्ते वय-34 वर्षे धंदा- नोकरी पद- निरीक्षक सार्वजनिक न्यास नोंदणी, कार्यालय,औरंगाबाद (वर्ग-3 ) रा. फ्लॅट नंबर 301 मिलेनिया हाईट, भाग्यनगर, औरंगाबाद |
| लाच मागणी रक्कम | :- | 15,000/- रुपये |
| लाच स्विकृती रक्कम | :- | 15,000/-रुपये |
| तपास अधिकारी | :- | श्री. हनुमंत वारे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदाराचे दोन्ही संस्थेचे त्रुटी काढलेवरुन मा.धर्मादाय आयुक्त कार्यालय यांना दोन्ही संस्थेचा अफरातफरीचा व संस्थेची नोंदणी रद्द करण्याचा रिपोर्ट न पाठवण्यासाठी |
| थोडक्यात माहिती | :- | यातील तक्रारदार यांचे दोन शैक्षणिक संस्थेचा अफरातफरीचा व संस्थेची नोंदणी रद्द करण्याचा रिपोर्ट न पाठवण्यासाठी श्री.सास्ते यांनी तक्रारदार यांना रुपये 15,000/- लाचेची मागणी करीत असलेबाबत तक्रारदार यांनी दि. 5/5/2022 रोजी तक्रार दिली.<br>सदर तक्रारीचे अनुषंगाने लाचेच्या मागणीची शहानिशा केली असता, **श्री सास्ते** यांनी तक्रारदार यांच्याकडे 15,000/- रुपयाची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,औरंगाबाद तर्फे दि.08/05/22 रोजी सापळा आयोजीत केला असता, आलोसे श्री. गणेश तेजराव सास्ते, पद-निरीक्षक सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय बाबा पेट्रोल पंपा शेजारी औरंगाबाद यांनी पंच साक्षीदारासमक्ष तडजोडी अंती लाचेची रक्कम रुपये 15,000/- मनमंदीर ट्रॅव्हल्ससमोर अदालत रोड औरंगाबाद येथे स्विकारल्यानंतर आलोसे यांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांचे विरुद्ध पो.स्टे.क्रांतीचौक औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |

सदर कारवाई, पोलीस अधीक्षक मा.डॉ.राहुल खाडे, अपर पोलीस अधीक्षक मा. विशाल खांबे, पोलीस उप अधिक्षक श्री. मारुती पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक, श्री. हनुमंत वारे यांनी कारवाई केली आहे. त्यांना सदरच्या कारवाई कामी पोना- साईनाथ तोडकर, विनोद आघाव, केवलसिंग घुसींगे, चालक चांगदेव बागुल यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना अवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.


संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद
ई- मेल :- sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com
ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net
संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,+320*
पोलीस अधीक्षक :- 8888807299
अपर पोलीस अधीक्षक :- 8788644994
पोलीस उप अधीक्षक :- 9356115189


**(मारुती पंडीत)**
**पोलीस उप अधीक्षक,**
**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद.**